# महाराष्ट्रातील बालमृत्यू व कुपोषणः वास्तव, प्रगती व अभाव

**डॉ. अभय बंग**

गेल्या वर्षी महाराष्ट्रात 18,000 बालमृत्यू झाले; हे फारच भयानक घडले; हे सर्व कुपोषणामुळे घडले असे मानून स्वयंसेवी संस्था, न्यायालय, माध्यमे सर्व जण क्षुब्ध आहेत.

'महाराष्ट्रात 18,000 बालमृत्यू' ही जरी दुःखद बाब असली तरी गणिताला गणिताच्या दृष्टीनेच बघायला हवे. वस्तुतः महाराष्ट्रात वर्षभरात जर खरोखर केवळ 18,000 बालमृत्यू झाले असतील तर यशाचा उत्सव साजरा करायला हवा. महाराष्ट्रात दरवर्षी जवळपास 20 लक्ष बाळ जन्माला येतात. बालमृत्यूंचा नुसता आकडा न बघता ते किती पैकी आहेत हे बघणे आवश्यक आहे. सहसा एक हजार जन्मांमागे किती बालमृत्यू अशा रीतीने त्यांचे प्रमाण मोजले जाते. 20 लक्ष जन्मांमागे 18,000 बालमृत्यू म्हणजे हे प्रमाण हजार जन्मांमागे नऊ असे येते. हे प्रमाण अमेरिकेतील बालमृत्यूंच्या प्रमाणाच्या जवळपास येते. प्रश्नच सुटला !

18,000 बालमृत्यूंचा आकडा माहितीच्या अधिकारात राज्य शासनाकडून प्राप्त झाला असे न्यायालयीन याचिकेचे वकील ॲड. उदय वारुंजीकर म्हणाले. बालमृत्यू न नोंदवून किंवा कमी नोंदवून हा प्रश्न सोडवायची जुनी शासकीय परंपरा आहे. मग खरा आकडा कोणता ?

भारत सरकारची सॅंपल रजिस्ट्रेशन सिस्टीम गेली अनेक दशके देशातील साठ ते सत्तर लक्ष लोकसंख्येच्या रॅंडम सॅंपलमधे मोजमाप करुन दरवर्षी राज्यांचा अर्भक मृत्युदर सांगते. शिवाय नॅशनल फॅमिली हेल्थ सर्वे (एन.एफ.एच.एस.) हे दर सात-आठ वर्षांनी होणारे राष्ट्रीय सर्वेक्षण अर्भक व बालमृत्युदरांविषयी अधिकृत अंदाज देतात. एन.एफ.एच.एस. चौथ्या सर्वेक्षणाचा अहवाल नुकताच उपलब्ध झाला असून त्यानुसार महाराष्ट्राचा बालमृत्युदर (0-5 वर्षे वयातील मृत्यू) हा 2015 मधे हजार जन्मांमागे 29 होता. हे प्रमाण 20 लक्ष जन्मांना लावले की महाराष्ट्रातील एकूण बालमृत्यूंचा आकडा 58,000 एवढा येतो.

पण 2001 साली महाराष्ट्रातल्या तेरा स्वयंसेवी संस्थांनी मिळून केलेल्या 'कोवळी पानगळ' अभ्यासावर आधारित, 'Hidden Child Mortality in Maharashtra' हा अहवाल भारत सरकारच्या आरोग्य विभागाने प्रकाशित केला आहे. (बंग, रेड्डी व देशमुख, 2005) त्यानुसार सॅंपल रजिस्ट्रेशन सिस्टीम व एन.एफ.एच.एस. देखील काही प्रमाणात नवजात बालकांचे मृत्यू नोंदणे चुकवितात व वास्तविक बालमृत्युदर 25 ते 30 टक्क्यांनी जास्त होता. त्या हिशोबाने महाराष्ट्रातील सध्याच्या बालमृत्यूंची संख्या 75,000 च्या जवळपास जाते.

हा आकडा धक्कादायक वाटला तरी त्यात एक सकारात्मक बातमी आहे. वर्ष 2000 मधील बालमृत्यूंच्या तुलनेत हा आकडा जवळपास निम्मा आहे. वर्ष 1998 मधे एन.एफ.एच.एस. च्या अंदाजानुसार महाराष्ट्रात 1,26,000 बालमृत्यू होत होते, आता 58,000 होतात (54 टक्के कमी). किंवा स्वयंसेवी संस्थांच्या 2001 मधील अंदाजानुसार पौणे दोन लक्ष बालमृत्यू होत होते ते आता 75,000 होतात (57 टक्के कमी). *दोन्ही हिशोबांनी गेल्या पंधरा वर्षांमधे महाराष्ट्रातील*

*बालमृत्यू जवळपास पन्नास ते साठ टक्क्यांनी कमी झाले आहेत.* महाराष्ट्राचे व शासनाचे त्यासाठी आपण अभिनंदन करायला हवे.

पण चार बाबतीत आपण अपयशी ठरलो आहोत.

1. शासकीय यंत्रणा अजूनही बालमृत्यू अपु-या नोंदविते. गेल्या वर्षी झालेल्या अंदाजित 58,000 किंवा 75,000 बालमृत्यूंपैकी केवळ 18,000, म्हणजे 25 ते 35 टक्केच बालमृत्यू नोंदविले गेले. शासनाने नेमलेल्या बालमृत्यू मूल्यांकन समितीने आपल्या अहवालात (2004) काढलेला निश्कर्ष – राज्यातले शासकीय विभाग केवळ 20-30 टक्के बालमृत्यू नोंदवितात – हे आज देखील जवळपास तितकेच खरे आहे.
2. बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण फार मंद गतीने कमी होते आहे. आर्थिक विकासाचा दर वार्षिक 7 ते 8 टक्के दावा करणा-या देशातील सर्वात प्रगत महाराष्ट्र राज्यात एन.एफ.एच.एस.-3 व 4 च्या दरम्यान दहा वर्षात (2006-2015) बालमृत्यूचे दर हजारी प्रमाण 58 वरुन 29 वर म्हणजे वर्षाला 3 ने कमी झाले पण कुपोषणाचे प्रमाण 46 वरुन 34 टक्के म्हणजे फक्त वर्षाला 1.2 टक्का कमी झाले. राज्याच्या व राष्ट्राच्या आर्थिक विकासाची आगगाडी भरमसाट वेगाने सुटली असतांना तिने आपल्या कोट्यावधी बालकांना कुपोषणाच्या प्लॅटफार्मवर मागे सोडून दिले आहे.
3. आदिवासी बालकांची स्थिती याहून खराब आहे. गैरआदिवासी भागामधील कुपोषण (स्टंटिंग) देशभरात 40 टक्के तर आदिवासी बालकांमधील कुपोषण 51 टक्के आहे. 2011 च्या जनगणनेच्या आधारावरुन केलेल्या अंदाजानुसार (लॅन्सेट 2016) भारतातील गैरआदिवासींमधील अर्भक मृत्यूदर 61 तर आदिवासींमधील अर्भकमृत्यूदर 74 होता. भारतातील एकूणच प्रचंड कुपोषणात आदिवासी बालकांमधील कुपोषण भयंकर आहे व त्यांच्यात बालमृत्यूंचे प्रमाण इतरांपेक्षा 20 टक्क्यांनी जास्त आहे.
4. कुपोषण व बालमृत्यूंच्या बातम्यांमुळे व्यथित झालेल्या विधीमंडळाच्या मागणीमुळे महाराष्ट्र शासनाने 2003 साली ‘बालमृत्यू मूल्यांकन समिती’ निर्माण केली. तज्ञ, वरीष्ठ अधिकारी व स्वयंसेवी अशा तिन्ही प्रकारचे सदस्य व मी अध्यक्ष असलेल्या या समितीने 2004 व 2005 साली दोन अहवाल व शिफारसी शासनाला दिल्या. तत्कालीन आरोग्यमंत्री डॉ. विमल मूंदडा यांनी ‘शासन हे अहवाल स्वीकारत असून त्यातील त्यातील शिफारसी पूर्णपणे अमलात आणण्यात येतील’ अशी विधीमंडळात ग्वाही दिली. त्यातील शिफारसींवर किती व कशी अंमलबजावणी झाली ? अकरा वर्षांनंतर याचा आढावा घेण्याची गरज आहे. त्यातील काही शिफारसींची राष्ट्रीय पातळीवर तर काहींची राज्य पातळीवर अंमलबजावणी झाली. पण अनेक शिफारसींवर अजून कृती नाही. उदाहरणार्थ
    - घरोघरी नवजात बालसेवा ही पध्दत ‘आशां’मार्फत लागू करण्याचे ठरले. पण 2016 पर्यंत राज्यातील सर्व आशांचे त्याबाबतीत पूर्ण प्रशिक्षण व्हायचे आहे. ज्यांचे प्रशिक्षण झाले त्यांना सर्व उपकरणे व औषधे मिळायची आहेत. राज्यात जन्माला

आलेल्या 20 लक्ष नवजात बालकांपैकी किती टक्के बालकांना पूर्ण घरोघरी नवजात बाळ सेवा मिळाली ?  त्यातील कळीचे उपाय – जंतुदोष व न्युमोनियासाठी अँटीबायटिक किती आशांकडे आहे ? किती आजारी बालकांना ती औषधे मिळाली ? अपुरी कृती असेल तर परिणाम कसा पुरेसा मिळेल ? राज्यात अजूनही दरवर्षी 58,000 ते 75,000 बालमृत्यू घडत असतांना हे उपाय पूर्णपणे केव्हा लागू होणार?

थोडक्यात – महाराष्ट्रातील एकूण बालमृत्यूंचे प्रमाण गेल्या पंधरा वर्षात निम्म्याने कमी झाले ही स्वागतार्ह बाब घडली, पण तरी अजूनही दरवर्षी 58,000 ते 75,000 बालमृत्यू घडतात. कुपोषण फार संथ गतीने कमी झाले व आदिवासी बालकांमधे तर कुपोषण व बालमृत्यू इतरांपेक्षा 20-25 टक्क्यांनी जास्त आहेत. बालमृत्यू समितीच्या अनेक शिफारसींवर योग्य व पूर्ण कृती झालेली नाही. ती झाल्यास हे प्रश्न अजून झपाट्याने कमी करता येतील.

हे का महत्वाचे आहे ?

आर्थिक विकास झाला म्हणजे सर्वकाही साध्य होत नाही. महाराष्ट्राचा आर्थिक विकास वेगाने होत असतांना 1990 ते 2015 च्या काळातच विदर्भात शेतक-यांच्या आत्महत्त्या, कुपोषण व बालमृत्यू आणि नक्षलवाद वाढले, मराठवाड्यात दुष्काळ माजला. आर्थिक विकासासोबत न्याय्य सामाजिक विकास होणे आवश्यक आहे. अन्यथा लहान मुलांच्या पोषणाच्या व जिवंत राहण्याच्या मानवीय हक्कांचे हनन होतेच शिवाय जिवंत राहिलेली पिढी शारिरिक दृष्ट्या खुरटी, बौध्दिक दृष्ट्या अल्पमती व वैद्यकीय ज्ञानानुसार (बार्कर हायपॉथिसिस) मोठेपणी मधुमेह, हृदयरोग व लकवा यांनी ग्रस्त होते. अपंग व रोगी मानवीय बळ हे आर्थिक प्रगतीला टिकवू शकणार नाही. वस्तुतः ते आर्थिक भरभराटीला निरर्थक करुन टाकेल.

युनिसेफचे महासंचालक, जिम ग्रँट, अफ्रिकेच्या दुष्काळात गेले असता त्यांनी एका कुपोषित मुलाला विचारलं, “मुला, मोठं झाल्यावर काय बनण्याचं तुझं स्वप्न आहे ?”

दोन क्षण स्तब्ध राहून ते मूल म्हणालं, “मोठं होईपर्यंत जिवंत राहण्याचं माझं स्वप्न आहे.”

----xxx----